INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 16 | ISSUE - 4 | MAY – 2026

# सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास

**श्री. सच्चिदानंद आप्पासाहेब लाळसंगी**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी

**प्रा.डॉ.रामेश्वर एम.मोरे**
संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,मंद्रूप

**गोषवारा :**

सदर संशोधनात सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या आर्थिक स्थितीचा व त्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे) एकात्मिक बाल विकास सेवा .ICDS) योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या या कर्मचाऱ्यांचे बालकांचे पोषण, आरोग्य व प्रारंभिक शिक्षण यामध्ये महत्त्वाचे योगदान असूनही त्यांना मिळणारे मानधन अत्यल्प असल्याचे दिसून येतेअंगणवाडी कर्मचाऱ्यांची ३०० संशोधनासाठी सहेतुक नमुना निवडीद्वारे. निवड करून प्राथमिक व दुय्यम माहित ीचे संकलन करण्यात आले.



सदर अभ्यासातून असे स्पष्ट झाले की, बहुसंख्य कर्मचाऱ्यांमध्ये मानधनाबाबत तीव्र असमाधान आहे आणि त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतोउत्पन्न व खर्च यामध्ये मोठी तफावत ., वाढती महागाई, मानधनातील विलंब तसेच सामाजिक सुरक्षा सुविधांचाअभाव यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीवर प्रतिकूल परिणाम झाला आहेयाचा परिणाम त्यांच्या कौटुंबिक जीवनावर., मानसिक आरोग्यावर तसेच कार्यक्षमतेवर होत असून सेवांच्या गुणवत्तेत घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सदर अभ्यासातून असे निष्कर्ष निघतात की, अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे सध्याचे मानधन अपुरे असून त्यात वाढ करणे, सामाजिक सुरक्षा सुविधा उपलब्ध करून देणे आणि नियमित वेतन प्रणाली विकसित करणे अत्यावश्यक आहेया उपाययोजनांमुळे त्यांच्या . .जीवनमानात सुधारणा होऊन अंगणवाडी सेवांची गुणवत्ता अधिक सक्षम होऊ शकते

**मुख्य शब्द :** अंगणवाडी, एकात्मिक बाल विकास सेवा, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आर्थिक स्थिती, समाजशास्त्रीय अभ्यास

## प्रस्तावना :

एखाद्या व्यक्तीची आर्थिक स्थिती समजून घेणे आणि तिचे परिणामकारक व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण त्याचा थेट परिणाम त्यांच्या सर्वांगीण जीवनमानावर होतोआर्थिक स्थैर्य केवळ उपजीविकेपुरते मर्यादित नसून ते आरोग्य., शिक्षण, सामाजिक सहभाग आणि वैयक्तिक सन्मान या सर्व घटकांवर प्रभाव टाकतेयामुळे कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी त्यातील घटकांची . .आर्थिक स्थिती सक्षम असणे अत्यावश्यक ठरते

एकात्मिक बाल विकास सेवा )ICDS) योजनेअंतर्गत देशाच्या कानाकोपऱ्यात कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या समाजविकासाच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाच्या घटक आहेतबालकांचे पोषण., आरोग्य आणि प्रारंभिक शिक्षण यांसारख्या मूलभूत बाबींमध्ये त्या मोलाची भूमिका बजावतातसमाजातील . प्रत्येक घटकाचा अंगणवाडीशी थेट किंवा अप्रत्यक्ष संबंध येत

असल्यामुळे, या कर्मचाऱ्यांच्या कार्याचा प्रभाव व्यापक आणि दीर्घकालीन आहे २१ .व्या शतकातील भारतात सामाजिक परिवर्तन घडवण्यात त्यांचा वाटा अनन्यसाधारण आहेतथापि ., त्यांच्या कार्याच्या तुलनेत मिळणारे मानधन अत्यल्प असून, त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा व्हावी ही अपेक्षा रास्त आणि न्याय्य आहे.

याच पार्श्वभूमीवर, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनवाढीसाठी संसदेपुढेअंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी' मदतनीसांसाठी कल्याणकारी उपाययोजनाया विधेयकाद्वारे सध्याचे प्रोत्साहन अपुरे असल्याचे .हे विधेयक सादर करण्यात आले ' अधोरेखित करण्यात आले असून, केंद्र सरकारचा आर्थिक सहभाग वाढवण्याची गरज व्यक्त करण्यात आलीअंगणवाडी कर्मचाऱ्यांना . मिळणारे सुमारे₹४,५०० इतके मासिक मानधन अत्यंत अपुरे व चिंताजनक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या संदर्भात पाहता, अंगणवाडी कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच आव्हानात्मक दिसून येतेदुष्काळग्रस्त . ग्रामीण स्वरूप असलेल्या या भागात अनेक कुटुंबे शेती-आणि अर्धशहरी, मजुरी किंवा असंघटित क्षेत्रांवर अवलंबून आहेतउपलब्ध . स्थानिक सर्वेक्षणांनुसार, सुमारे ६० ते ७० टक्के अंगणवाडी सेविका निम्न किंवा निम्नमध्यम आर्थिक गटातील आहेत-, तर जवळपास ३० ते ४० टक्के कुटुंबांचे मासिक उत्पन्न₹१०,००० पेक्षा कमी आहे.त्यातच मानधन वेळेवर न मिळणे ही समस्या अधिक गंभीर बनवते.

याशिवाय, अनेक वेळा अंगणवाडी कर्मचाऱ्यांना प्रवास, मोबाईल डेटा, तसेच केंद्राच्या दैनंदिन गरजांसाठी स्वतःच्या खिशातून खर्च करावा लागतो, ज्यामुळे त्यांच्या प्रत्यक्ष उत्पन्नावर अधिक ताण येतोसामाजिक सुरक्षेच्या योजना उपलब्ध असल्या तरी त्यांची . अंमलबजावणी अपुरी किंवा असमान असल्यामुळे आर्थिक सुरक्षिततेचा अभाव प्रकर्षाने जाणवतो

एकूणच, सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती ही अशी 'महत्त्वपूर्ण सेवा पण अपुरा मोबदला' समाजाच्या पायाभूत विकासात मोलाची भूमिका बजावत असतानाही .विरोधाभासी आहे, त्यांना आर्थिकदृष्ट्या संघर्ष करावा लागतो. परिणामी, अनेकांना पूरक उत्पन्नासाठी शेती, लहान व्यवसाय किंवा इतर कामांवर अवलंबून राहावे लागतेत्यामुळे त्यांच्या आर्थिक . स्थितीचा अभ्यास हा केवळ उत्पन्नाच्या मर्यादेत न पाहता, ग्रामीण अर्थव्यवस्था, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक सुरक्षा यांच्या व्यापक चौकटीत समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे

## संशोधनाची उद्दिष्टये :

१. सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे अध्ययन करणे.
२. सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

## संशोधनाची गृहीतकृत्य:

सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अल्प मानधनामुळे विविध आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधात सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडीमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमूना निवडीद्वारे सोलापूर जिल्ह्यातील ३०० अंगणवाडी कर्मचाऱ्यांची निवड करून अनुसूची व निरीक्षण तंत्राच्या माध्यमातून प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यात आले.दुय्यम तथ्यासाठी संदर्भ ग्रंथ, संशोधन अहवाल, अंगणवाडी आणि कर्मचारी यांच्या संबंधी विविध वर्तमानपत्रात, मासिकांमध्ये छापून आलेल्या लेखांचा पण संशोधकाने आवश्यक तेथे उपयोग करुन घेतला तसेच ग्रंथालयातील पुस्तकांचा उपयोग करण्यात आला. संकलित तथ्यांचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

## अल्प मानधन- एक समस्या :

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन अत्यंत कमी असून त्यांच्या कामाच्या तुलनेत ते अपुरे वाटतेरोजच्या गरजा . असताना त्यांचे मानधन मात्र स्थिर राहते भागवताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. महागाई सतत वाढत, त्यामुळे आर्थिक असुरक्षितता निर्माण होते .अनेक कर्मचाऱ्यांना अतिरिक्त काम करावे लागते, ज्यामुळे त्यांचा मानसिक ताण वाढतो आणि कामाचा

दर्जा टिकवणे कठीण होतेअभाव असल्याने त्यांच्या अडचणी सरकारकडून अपेक्षित सुविधा मिळत नसल्याने आणि सामाजिक सुरक्षेचा. अधिक वाढतात. निवृत्तीवेतन किंवा विमा यांसारख्या योजना देखील अपुऱ्या आहेतत्यांच्या कामाचे महत्त्व मोठे असूनही त्यांना योग्य . होत आहे. यामुळे मोबदला मिळत नाही. बालक आणि महिलांच्या सेवेत ते महत्त्वाची भूमिका बजावत असतानाही त्यांचे आर्थिक शोषण कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत असून काहीजण नोकरी सोडण्याचा विचार करतात, ज्याचा परिणाम सेवा गुणवत्तेवर होतोविशेषतः ग्रामीण . भागात ही समस्या अधिक तीव्र आहे. त्यामुळे सरकारने मानधन वाढवण्याची गरज असून योग्य मानधन दिल्यास त्यांचे जीवनमान नक्कीच .सुधारेल यासंदर्भात माहिती घेतली असता पुढील प्रमाणे तथ्ये आढळून आली.

**तक्ता क्र.१- अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मिळत असलेल्या मानधनाबाबत त्यांचे समाधानदर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मिळत असलेल्या मानधनाबाबत त्यांचे समाधान | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | समाधानी आहेत | १०८ | २८ % |
| २. | समाधानी नाहीत | २४२ | ७२ % |
| | **एकूण** | **३५०** | **१००%** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १०८(२८ %) अंगणवाडी कर्मचारी त्यांना मिळणाऱ्या मानधनाबाबत समाधानी आहेत. २४२ (७२ %) अंगणवाडी कर्मचारी त्यांना मिळणाऱ्या मानधनाबाबत समाधानी नाहीत.

वरील निष्कर्षांवरून असे स्पष्टपणे जाणवते की अंगणवाडी कर्मचाऱ्यांमध्ये मानधनाबाबत मोठ्या प्रमाणात असमाधान आहे . असमाधान केवळ आर्थिक मर्यादांपुरते मर्यादित नसून त्याचे सामाजिक आणि मानसिक परिणामही दिसून येतातअंगणवाडी कर्मचारी हे . बालकांचे पोषण, आरोग्य, पूर्वप्राथमिक शिक्षण आणि माता .बालक कल्याण यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडतात- तरीही त्यांच्या कामाच्या स्वरूपाच्या तुलनेत मिळणारे मानधन अपुरे असल्याची भावना त्यांच्या मनात तीव्र आहे.

यामध्ये आणखी असेही दिसून येते की, सध्याच्या वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या उत्पन्नाची क्रयशक्ती कमी होत चालली आहेघरखर्च ., मुलांचे शिक्षण, आरोग्यसेवा यांसारख्या आवश्यक खर्चांची पूर्तता करताना त्यांना आर्थिक ताण सहन करावा लागतोत्यामुळ .े त्यांच्या जीवनमानावर नकारात्मक परिणाम होतोअनेक वेळा त्यांना कर्ज घेण्याची वेळ येते किंवा अतिरिक्त . उत्पन्नासाठी इतर कामे करण्याची गरज भासते, ज्यामुळे त्यांच्या मुख्य कामावर परिणाम होण्याची शक्यता वाढते

याशिवाय, मानधनाबाबतचे असमाधान हे त्यांच्या कामातील प्रेरणेला देखील बाधा आणतेजेव्हा कामाच्या मानाने योग्य . मोबदला मिळत नाही, तेव्हा कर्मचाऱ्यांमध्ये कामाविषयी उदासीनता निर्माण होऊ शकतेयाचा थेट परिणाम अंगणवाडी सेवांच्या गुणवत्तेवर. होऊ शकतो, ज्यामुळे लाभार्थ्यांना मिळणाऱ्या सेवांमध्ये घट होण्याची शक्यता आहे.

तसेच, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अनेक वेळा अतिरिक्त प्रशासकीय कामे, सर्वेक्षण, लसीकरण मोहिमा इत्यादी जबाबदाऱ्या दिल्या जातातयामुळे कर्मचारी टिकून राहण्याचे .या सर्व कामांच्या ओझ्याच्या तुलनेत मानधन कमी असल्याने त्यांचा असंतोष अधिक वाढतो. प्रमाण कमी होणे, कामाचा ताण वाढणे आणि नवीन कर्मचाऱ्यांना आकर्षित करण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात

या पार्श्वभूमीवर, शासनाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहेत्यांच्या कामाचे महत्त्व लक्षात . घेऊन त्यांना योग्य वेतन, भत्ते आणि इतर सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहेतसेच ., नियमित वेतनवाढ, सामाजिक सुरक्षा योजना, आरोग्य विमा यांसारख्या उपाययोजना राबविल्यास त्यांच्या जीवनमानात सुधारणा होईल आणि कामाबद्दलची त्यांची बांधिलकि व कार्यक्षमता वाढेल .अशाप्रकारे, या माहितीवरून असे म्हणता येईल की ,अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन वाढवणे आणि त्यांच्या समस्या सोडवणे हे केवळ त्यांच्या वैयक्तिक हितासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठीही अत्यंत आवश्यक आहे

यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, बहुतांश अंगणवाडी कर्मचारी त्यांना मिळणाऱ्या मानधनामध्ये समाधानी नाहीतआणि मिळणाऱ्या मानधनामध्ये समाधानी असणाऱ्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे.

## आर्थिक समस्या :

अंगणवाडी कर्मचारी (सेविका व मदतनीस) हे Integrated Child Development Services (ICDS) योजनेचे मुख्य आधारस्तंभ असूनही त्यांना अनेक गंभीर आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. सर्वप्रथम, त्यांना नियमित वेतनाऐवजी अत्यल्प मानधन दिले जाते, जे वाढत्या महागाईच्या तुलनेत अपुरे ठरते आणि त्यांच्या आर्थिक स्थितीवर नकारात्मक परिणाम करते. याशिवाय, मानधन वेळेवर न मिळाल्यामुळे दैनंदिन खर्च भागवणे कठीण होते, कारण अनेकदा २–३ महिन्यांचा विलंब होतो. सामाजिक सुरक्षा सुविधांचा अभाव हीदेखील मोठी समस्या आहे; पेन्शन, आरोग्य विमा आणि भविष्यनिर्वाह निधी यांसारख्या सुविधा अपुऱ्या असल्याने भविष्यासाठी आर्थिक सुरक्षितता राहत नाही. तसेच, ICDS व्यतिरिक्त निवडणुका, सर्वेक्षण आणि लसीकरण मोहिमा अशा विविध सरकारी कामांमध्ये त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा भार टाकला जातो, परंतु त्यासाठी कोणताही स्वतंत्र मोबदला मिळत नाही. यासोबतच, गावोगावी जाऊन काम करताना होणारा प्रवास आणि इतर खर्च त्यांना स्वतःच करावा लागतो, कारण योग्य भत्त्यांची कमतरता असते. अंगणवाडी कर्मचारी कायमस्वरूपी सरकारी कर्मचारी नसल्यामुळे नोकरीची हमी आणि वेतनवाढीची ठोस प्रणाली नसणे हीही एक महत्त्वाची अडचण आहे. याशिवाय, महागाई वाढत असताना भत्त्यांमध्ये नियमित वाढ होत नसल्यामुळे त्यांच्या खरेदी शक्तीत सतत घट होत जाते. त्यामुळे या सर्व समस्यांमुळेत्यांच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम होतो. यासंदर्भात माहिती घेतली असता पुढील प्रमाणे तथ्ये आढळून आली.

**तक्ता क्र. ५.३- अल्प मानधनामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना जाणवणाऱ्या आर्थिक समस्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | अल्प मानधनामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना जाणवणाऱ्या समस्या | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आर्थिक समस्या | १७८ | ५१ % |
| २. | कौटुंबिक समस्या | ८० | २२.७२% |
| ३. | समाजात मानाचे स्थान मिळत नाही | ०३ | ०१.१४% |
| ४. | गरजा पूर्ण करू शकत नाही | ८९ | २५.१४% |
| | **एकूण** | **३५०** | **१००%** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि .अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनाशी संबंधित समस्या स्पष्टपणे अधोरेखित होतात, १७८ एकूण प्रतिसादांपैकी(५१कर्मचाऱ्यांनी अल्प मानधनामुळे आर्थिक अडचणी जाणवत असल्याचे सांगितले आहे(%००., जे सर्वाधिक प्रमाण आहेदैनंदिन गरजा .यावरून त्यांच्या उत्पन्न आणि खर्चामध्ये मोठी तफावत असल्याचे दिसते ., मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च यांसारख्या मूलभूत बाबी पूर्ण करताना त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो८० तसेच .(२२कर्मचाऱ्यांनी कौटुंबिक (%७२. समस्या निर्माण होत असल्याचे नमूद केले आहे, ज्यावरून आर्थिक अस्थिरतेचा त्यांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक आयुष्यावरही परिणाम होत असल्याचे दिसते.

याशिवाय ८९ कर्मचाऱ्यांनी मानधन कमी असल्यामुळे स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यात अडथळे येत असल्याचे (%१४.२५) सांगितले आहे, जे त्यांच्या जीवनमानावर थेट परिणाम करणारे आहे ०३ फक्त .(०१कर्मचाऱ्यांना समाजात मानाचे स्थान मिळत (%१४. नसल्याची भावना आहे, जरी हे प्रमाण कमी असले तरी सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने हा मुद्दा दुर्लक्ष करण्याजोगा नाही

एकूणच, या सर्व बाबींचा विचार करता असे स्पष्ट होते की अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन त्यांच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी अपुरे आहेत्यामुळे त्यांना आर्थिक ., कौटुंबिक आणि वैयक्तिक स्तरावर विविध समस्या भेडसावत आहेतही परिस्थिती . म्हणूनच .त्यांच्या कार्यक्षमतेवर आणि सेवांच्या गुणवत्तेवरही परिणाम करू शकतेत्यांच्या मानधनात वाढ करून त्यांच्या जीवनमानात सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे

यावरून असा निष्कर्ष काढता येईल किकी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी, अल्प मानधनामुळे बहुसंख्य कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणी.अपुरे आहेंचा सामना करावा लागत असून, त्याचा त्यांच्या कौटुंबिक व वैयक्तिक जीवनावरही नकारात्मक परिणाम होत आहेतसेच ., स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यात येणाऱ्या अडचणी त्यांच्या जीवनमानावर थेट परिणाम करतात .यावरून स्पष्ट होते की सध्याची मानधन रचना अपुरी असून, त्यात वाढ करणे अत्यावश्यक आहेअन्यथा ., या परिस्थितीचा त्यांच्या कार्यक्षमतेवर व अंगणवाडी सेवांच्या गुणवत्तेवरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे

वरील विश्लेषणावरून आर्थिक समस्यांमुळेअंगणवाडी कर्मचाऱ्यांवर विविध प्रभाव पडलेले दिसून येतात त्यातील पहिला म्हणजे **आर्थिक प्रभाव** हा स्पष्टपणे दिसतो५१ कर्मचारी मानधनाबाबत असमाधानी आहेत आणि (%७२) बहुसंख्य .% कर्मचाऱ्यांना थेट आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतोवाढती महागाई .यावरून त्यांच्या उत्पन्न आणि खर्चामध्ये मोठी दरी आहे ., अपुरे मानधन आणि वेतनातील विलंब यामुळे त्यांच्याजीवनमानात घट होत आहेपरिणामी ., कर्जबाजारीपणा वाढणे किंवा अतिरिक्त काम करण्याची गरज निर्माण होणे हे प्रकार वाढतात .दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे**कौटुंबिक आणि वैयक्तिक प्रभाव**. २२कर्मचाऱ्यांनी कौटुंबिक %७२. समस्या निर्माण होत असल्याचे नमूद केले आहे, तर २५यावरून .कर्मचाऱ्यांना स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यात अडचणी येतात%१४. आर्थिक अस्थिरता त्यांच्या कुटुंबातील संबंध, मानसिक आरोग्य आणि एकूण जीवनसमाधानावर नकारात्मक परिणाम करत असल्याचे स्पष्ट होते .तिसरा मुद्दा म्हणजे **मानसिक व प्रेरणात्मक प्रभाव**. कमी मानधनामुळे कामाविषयीची प्रेरणा कमी होते, असंतोष वाढतो आणि उदासीनता निर्माण होऊ शकतेजेव्हा कामाच्या तुलनेत योग्य मोबदला मिळत नाही ., तेव्हा कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आणि कामातील बांधिलकी कमी होण्याची शक्यता असतेचौथा महत्त्वाचा पैलू म्हणजे. **सेवेच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम**. अंगणवाडी कर्मचारी बालकांचे पोषण, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडतातपरंतु त्यांच्या असमाधानामुळे आणि . वाढत्या कामाच्या ताणामुळे सेवांच्या गुणवत्तेत घट होण्याची शक्यता आहे, ज्याचा थेट परिणाम लाभार्थ्यांवर होऊ शकतोपाच.वा मुद्दा म्हणजे **प्रशासकीय आणि व्यवस्थापनात्मक प्रभाव**. कमी मानधन, अतिरिक्त कामाचा भार आणि सामाजिक सुरक्षा सुविधांचा अभाव यामुळे कर्मचारी टिकवून ठेवणे कठीण होतेनवीन कर्मचाऱ्यांना आकर्षित करण्यात अडचणी येतात आणि कामाचा ताण वाढतो ., ज्यामुळे संपूर्ण योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम होतो .शेवटी, **सामाजिक प्रभाव** देखील लक्षात घेण्यासारखा आहे जरी कमी प्रमाणात . कर्मचाऱ्यांनी सामाजिक प्रतिष्ठेबाबत समस्या व्यक्त केली असली तरी (%१४.१), दीर्घकालीन दृष्टीने हा मुद्दा महत्त्वाचा ठरू शकतो . समाजातील या महत्त्वाच्या घटकाला योग्य मान्यता न मिळाल्यास त्यांच्या भूमिकेचे अवमूल्यन होऊ शकते

## निष्कर्ष:

सदर संशोधनाच्या आधारे पुढील महत्त्वाचे निष्कर्ष मांडता येतात:

1) अंगणवाडी कर्मचाऱ्यांमध्ये मानधनाबाबत मोठ्या प्रमाणात असमाधान आहे.
2) निम्म्याहून अधिक कर्मचारी थेट आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत.
3) उत्पन्न आणि खर्च यामध्ये मोठी असंतुलन स्थिती निर्माण झाली आहे.
4) वाढती महागाई आणि अपुरे मानधन यामुळे जीवनमानावर नकारात्मक परिणाम झाला आहे.
5) वेतनातील विलंबामुळे आर्थिक ताण अधिक वाढतो आहे.
6) आर्थिक अस्थिरतेमुळे कौटुंबिक समस्या आणि तणाव निर्माण होत अहेत.
7) अनेक कर्मचाऱ्यांना स्वतःच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे कठीण जात आहे
8) कमी मानधनामुळे कामावरील प्रेरणा आणि कार्यक्षमता घटत आहे.
9) सेवांच्या गुणवत्तेवर परिणाम होऊन बालकांच्या पोषण व शिक्षण सेवांवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे.
10) कमी मानधन, जास्त कामाचा ताण आणि सुविधा अभाव यामुळे कर्मचारी टिकवून ठेवणे व व्यवस्थापन कठीण झाले आहे.

## समारोप:

अंगणवाडी कर्मचाऱ्यांमध्ये मानधनाबाबत मोठ्या प्रमाणात असमाधान दिसून येत असून अनेकजण आर्थिक अडचणींचा थेट सामना करत आहेतउत्पन्न आणि खर्च यामध्ये निर्माण झालेल्या . असंतुलनामुळे त्यांचे दैनंदिन जीवन अधिक कठीण झाले आहेवाढती . वेतनातील विलंबामुळे आर्थिक ताण अधिक .महागाई आणि अपुरे मानधन यामुळे त्यांच्या जीवनमानावर नकारात्मक परिणाम होत आहे या आर्थिक अस्थिरतेचा परिणाम त्यांच्या कौटुंबिक.वाढून परिस्थिती आणखी गंभीर बनत आहे जीवनावर होऊन तणाव आणि समस्या निर्माण होत आहेतकमी मानधन आणि जास्त कामाचा ताण .अनेक कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणेही कठीण झाले आहे याचा थेट परिणाम सेवांच्या गुणवत्तेवर होऊन बालकांच्या पो.यामुळे कामावरील प्रेरणा आणि कार्यक्षमता कमी होत आहेषण व शिक्षण सेवांवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहेकमी मानधन ., कामाचा अतिरिक्त ताण आणि सुविधा अभाव यामुळे

कर्मचारी टिकवून ठेवणे आणि व्यवस्थापन करणे कठीण झाले आहेयामुळे या सर्व समस्यांवर गांभीर्याने विचार करून योग्य उपाययोजना . करणे अत्यंत आवश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१. घाटोळे र.ना. (२००३) समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती, ८ वी आवृत्ती, नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.
२. आगलावे प्रदिप (२००९) समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, नागपूर, साईनाथ प्रकाशन.
३. वाखरडे सोनाली (२०११) मूलभूत सामाजिक संस्था, लातूर, अरुणा प्रकाशन.
४. कुलकर्णी प्रभाकर (२००७) सामाजिक विचारप्रवाह , नागपूर, मंगेश प्रकाशन.
५. कुंडले म.बा. (२००३) शैक्षणिक समाजशास्त्र, नागपूर, श्रीविद्या प्रकाशन.
६. अंगणवाडी संदर्भातील विविध शासन निर्णय.